# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०५.०५.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०४.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण ६१५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, जुगार कायदा अन्वये ०४ केसेसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करुन १८,४५५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,४८५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२१,६५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०२ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक, ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक २३.०४.२०२६ चे १७.०० वा. ते २३.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत क्वॉलिटी वाईन शॉपसमोर, मंगलमुर्ती नगर, नागपूर येथे फिर्यादी प्रज्योत सतिश कांबळे वय २० वर्षे रा. प्लॉट क्र. ६२, विवेकानंद शाळेजवळ, बहादुरा फाटा, नागपूर यांची होन्डा शाईन गाडी क्र. एमएच ३१ जीई ५८८२ किंमती ८०,०००/—रू. ची ही त्यांचा मित्र स्वराज सुरकार वय २१ वर्ष रा. देशमुखपुरा, वर्धा याने लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०२ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपी नामे प्रशांत रमेश जोंधळे वय ४० वर्षे, रा. ट्रस्ट ले आऊट, पांढराबोडी, जाधव चे घरी किरायाने, अंबाझरी, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता त्याने या गुन्हया व्यतीरिक्त पोलीस ठाणे सिताबर्डी हद्यीतून ग्रे रंगाची झेन टिव्हीएस रायडर क्र. एमएच ३१ जीई ८८४६ कि. ८०,०००/— रु ची असे एकुण ०२ वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपीस गुन्हयात अटक करून त्यांचे ताब्यातुन चोरी केलेले एकुण ०२ दुचाकी वाहने किंमती अंदाजे १,६०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी प्रतापनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. निसार तांबोळी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. संजय पाटील अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई.</u>**

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतून मानवी तस्करी व व्यवसायीक लैंगीक शोषणाची जाळी उखडून टाकण्याच्या उद्देशाने नागपूर शहरात सुरू असलेल्या **''ऑपरेशन शक्ती अंतर्गत''** दिनांक ०४.०५.२०२६ चे १७.१५ वा. ते २२.१० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट क्र. १०, माधव नगरी, बेसा पिपळा रोड, नागपूर येथे रेड कारवाई केली असता, तेथे राहणारी महिला आरोपी पद्मिनी गुलशन बसू वय २९ वर्षे ही स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करून, पिडीत मुलींकडुन देहव्यवसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन ०१ पिडीत मुलीची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख २,०००/—रू., ०२ मोबाईल फोन व ईतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे १७,०४०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीचे विरूध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे कलम १४३(२) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाई कामी हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. राहुल शिरे व त्यांचे पथकाने केली.

**४) गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०४.०५.२०२६ चे १४.४० वा. ते १६.४० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, कळमणा रोड, आईस फॅक्ट्रीमागे, येरखेडा, इस्माईलपुरा, कामठी येथे राहणारा आरोपी नामे अमित अशोक मते वय ३२ वर्ष याचे घराची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्याचे ताब्यामध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेला वेगवेगळ्या कंपनीचा वेगवेगळे फ्लेवरचे तंबाखु व खर्रा बनविण्याच्या ०५ मशिन असा मुद्देमाल मिळुन आला. त्यास विचारपुस केली असता, त्याने त्याचे साथीदार आरोपी क्र. २) प्रवेश प्रकाश फकीर्डे वय ३३ वर्ष रा. जयभीम चौक, नवीन कामठी, ३) नियाज अहमद वल्द वसीउजजमा अहमद वय ४५ वर्ष रा. नया गोदाम, इस्माईलपुरा, कामठी यांचे सोबत संगनमताने नमुद मुद्देमाल आणल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन तंबाखुजन्य पदार्थ मुद्देमाल, ०५ मशिनी असा एकुण ९८,९५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर अवैधरित्या विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे कलम १२३,२२३,२७४,२७५ भा.न्या.सं. सहकलम २६(१),२६(२)(iv),२७(३)(e),३०(२)(a),३(१)(iv)(zz) अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह नवीन कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.

## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०३.०५.२०२६ चे २३.१५ वा. चे सुमारास, फिर्यादी यांचे भाऊजी नामे अभिजीत चौबे वय ३५ वर्ष रा. लोकमान्य नगर, नागपूर हे त्यांचे दुचाकी ज्युपिटर मोपेड क्र. एमएच ३१ एफवाय ९१३४ ने फ्रेन्डस् कॉलनी कडून हजारी पहाडकडे जात असतांना पोलीस ठाणे गिटटीखदान हद्दीत शिवाजी चौक, हजारीपहाड येथे दुचाकी गाडी क्र. एमएच ४९ सीजे ४२७० चा चालक नामे मयंक संजय टामसेटवार वय १९ वर्ष रा. त्रिमुर्तीनगर, नागपूर याने त्याचे ताब्यातील दुचाकी गाडी भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे भाऊजीचे गाडीला जोरदार धडक दिल्याने ते रोडवर खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मॅक्स हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी उद्देश गिरधारीप्रसाद तिवारी वय २८ वर्षे रा. प्लॉट क्र. ५६९, बजरंग चौक, तिवारी किराणा स्टोअर्सजवळ, गिट्टीखदान, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि गोपाल राऊत ८६९८११६६९५ यांनी दुचाकी वाहन चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सक्करदरा:— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.०५.२०२६ चे २०.३० वा. ते ०४.०५.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, प्लॉट क्र. १६, सुभेदार ले आऊट, बसेश्वर चौक, सक्करदरा, नागपूर येथे राहणारे फिर्यादीचे भाऊ नामे मंगेश शेषराव साखरकर वय ४३ वर्ष हे त्यांचे राहते घराचे मुख्य दाराला कुलूप लावून परिवारासह दुबई येथे पर्यटनाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे भावाचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, घरातील बेडरुमचे कपाटात ठेवलेले रोख १,५०,०००/— रु. तसेच सोन्या—चांदीचे दागिने व डीव्हीआर असा एकुण किंमती ५,१५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यांप्रकरणी फिर्यादी सौ. रोहीणी सचिन दहिवले वय ४७ वर्ष रा. गोदरेज आनंदम टॉवर, गणेशपेठ, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. टेकाडे ८३९०९८८३२८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे वाठोडा :—** दिनांक ०४.०५.२०२६ चे १६.०० वा. ते ०५.०५.२०२६ चे ०९.०० चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत लाईफ लाईन हॉस्पिटल समोर, फुटपाथवर एक अनोळखी इसम वय अंदाजे ५० वर्ष वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही.

यांप्रकरणी फिर्यादी पवन सोमेश्वर घोडे वय ४० वर्षे रा. इंगोले नगर, हुडकेश्वर, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. स्वप्निल राऊत यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १३ वे प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३४/२००६ | कलम ३२३, २९४ भा.दं.वि. | वासुदेव गोदरुजी उईके रा. रानी दुर्गावती चौक, बिनाकी मंगळवारी, एनआयटी क्वॉर्टरजवळ, नागपुर | २८.०५.२०२६ |
| २. | मा. २रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपुर. | ३०५०३३२ /२००४ | कलम ३२६,३४ भा.दं.वि. | १) शेख शब्बीर शेख नजीर रा. मिनीमातानगर, मेनरोड, कळमणा नागपुर | १८.०५.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | २) सतिश कोंडीराम शंभरकर रा. प्लॉट क्र. १४५७, मिनीमाता नगर कळमणा, नागपुर<br>३) मनोहर बाबुराव काळे रा. प्लॉट क्र. ८४६२, मिनीमाता नगर, कळमणा, पाण्याचे टाकीजवळ नागपुर | |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**